कार्यालय
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
# जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, वर्ग-१, मुंबई,
सिटी टेलिफोन एक्सचेंज बिल्डिंग, एम. टी. एन. एल., तळ मजला, हजारीमल सोमणी मार्ग, मुंबई जिमखान्या जवळ, फोर्ट, मुंबई ४०० ००१
दु. क्र. ०२२- २२०००२२१ E Mail- dsamumbai479@gmail.com

---

जा. क्र. जिविलेप/मुंबई/पॅनल लेप/लेपशुल्क/ ४४६ / २०१७ दिनांक :१७/०३/२०१७

**अतितात्काळ/कालमर्यादा (Urgent)**

प्रति,

----------------------------

सनदी फर्म / सनदी लेखापाल / प्रमाणित लेखापरिक्षक
मुंबई.

**विषय :- सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण शुल्काचे वर्षनिहाय संकलन करणे बाबत...**

**संदर्भ** :- मा. सहकार आयुक व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक जा.क्र. सआ/लेखापरिक्षण/परिपत्रक/लेप शुल्क संकलन/३९७/२०१७ दि.१७/०२/२०१७

उपरोक्त विषय व संदर्भाचे आवलोकन व्हावे.

२/- सोबतचे परिपत्रकान्वये मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सुचित केल्या प्रमाणे जिल्हा निहाय व लेखापरिक्षक निहाय लेखापरिक्षण शुल्क आकरणी, वसूली व शिल्लक लेखापरिक्षण शुल्काची माहीती संकलीत करणे आवश्यक असल्याने आपण सन २०१५-१६ (३१ मार्च २०१७ अखेरचे) ठरावान्वये अथवा ज्या संस्थाचे ठराव दि. ३१/१०/२०१६ अखेर अप्राप्त होते अशा संस्थाचे जिल्हा उपनिबंधक यांचे कार्यालयाकडून निर्गमित केलेल्या परंतुकान्वये आदेशाने आपण जे लेखापरिक्षण पुर्ण केलेले आहे. अशा संस्थांचे सोबत जोडलेल्या प्रपत्रात (Annexure) एक्सेल शीट मध्ये लेखापरिक्षण शुल्काची (Audit fee) माहीती **तात्काळ** या कार्यालयास ई-मेल व्दारे सादर करावी जेणे करुन मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयास सादर करणे सुलभ होईल ज्या लेखापरिक्षकांची माहीती प्राप्त होणार नाही अश्या लेखापरिक्षकांची माहीती अप्राप्त आहे असे वरीष्ठ कार्यालयास कळविण्यात येईल.

सोबत :- संदर्भीय परिपत्रक व प्रपत्र (Annexure)

**(आर. सी. शाह)**
**जिल्हा विशेष लेखापरिक्षक**
**वर्ग-१, सहकारी संस्था, मुंबई**

(32)

राज्यातील सहकारी संस्थांच्या
लेखापरीक्षण शुल्काचे वर्षनिहाय
संकलन करणेबाबत.

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.**

**जा.क्र.सआ/लेखापरीक्षण/परिपत्रक/लेप.शुल्क.संकलन/ ३८५ /२०१७**
**दिनांक - १५ /०२/२०१७**

## -: परिपत्रक :-

महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या सुधारीत अधिनियमान्वये **संस्था** प्रत्येक वित्तीय वर्षात निदान एकदा आपल्या लेख्यांची लेखापरीक्षा करवील अशी तरतूद आहे. परंतु संस्थेने कलम ७५ चे पोटकलम (२अ) आणि कलम ७९ चे पोटकलम (१ब) अन्वये विहित तरतुदीप्रमाणे लेखापरीक्षकाची नेमणूक करण्यास आणि लेखापरीक्षक नेमणुकीबाबतची विवरणे दाखल करण्यास कसूर केली आहे, तेव्हा ती कारणे लेखी नमूद करून संबंधित निबंधक कलम ८१ (१)(अ) खालील परंतुकान्वये नामतालिकेतील एखाद्या लेखापरीक्षकांकडून त्या संस्थेच्या लेख्यांची लेखापरीक्षा करवून घेणेसाठी लेखी आदेश पारीत करील, अशीही तरतुद आहे. म्हणजेच सहकारी संस्थांना त्यांचे लेखापरीक्षण करून घेणे कायदयाने अनिवार्य आहे.

२/- सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण आर्थिक वर्ष समाप्ती पासुन ४ महिन्यांचे आत, म्हणजेच ३१ जुलै पर्यंत पुर्ण होणे बंधनकारक आहे. त्याचप्रमाणे लेखापरीक्षकाने आपला लेखापरीक्षा अहवाल, लेखापरीक्षण पुर्ण झालेपासून १ महिन्याच्या कालावधीच्या आत आणि कोणत्याही परिस्थितीत वार्षिक साधारण सभेच्या बैठकीची नोटीस देणेपूर्वी (माहे सप्टेंबर अखेरपर्यंत) संस्थेला आणि निबंधकाला सादर करणे कायदयाने बंधनकारक आहे.

३/- सहकारी संस्थेचा लेखापरीक्षक किंवा लेखापरीक्षा करणारी लेखापरीक्षक फर्म यांचे परिश्रमिक लेखापरीक्षण शुल्काचे स्वरूपात, राज्यशासन वेळोवेळी अधिसूचीत करेल त्या दराने संस्था प्रकारनिहाय संबंधीत संस्थेकडून देण्यात येईल, अशी तरतुद कलम ८१ (१) (फ) व नियम ७४ अन्वये आहे. तदनुषंगाने राज्यशासनाने दिनांक २९/१०/२०१४ रोजीचे शासन निर्णयान्वये संस्था प्रकारनिहाय खेळते भांडवल व उलाढालीचे प्रमाणात लेखापरीक्षकांचे परिश्रमिक लेखापरीक्षण शुल्काचे स्वरूपात निर्धारित करून दिलेले आहे.

४/- सर्वेक्षणाअंती दिनांक १ एप्रिल २०१६ चे अपेंडीक्स प्रमाणे राज्यातील सर्व प्रकारातील सहकारी संस्थांची एकूण संख्या १,९६,९०७ इतकी आहे. अधिनियमान्वये सर्व सहकारी संस्थांनी लेखापरीक्षा पुर्ण करवून घेणे अनिवार्य आहे. त्यास पुरक सहकार आयुक्तांचे अधिपत्याखालील सर्व संस्थांचे १०० % लेखापरीक्षण पुर्णत्वाचे मोहिमेस क्षेत्रीय स्तरावरून, संस्थांकडून व लेखापरीक्षकांचे पातळीवरून उचित प्रतिसाद मिळाल्याने लेखापरीक्षण पुर्णत्वाचे प्रमाण ८० % पर्यंत पोहचलेले आहे. तथापि राज्यामध्ये लेखापरीक्षकांचे परिश्रमिक तथा लेखापरीक्षण शुल्क रक्कम प्रतिवर्षी जिल्हा व विभागनिहाय किती अदा केली जाते, याचे संकलन वर्षानुवर्षे करणेत आलेले नाही. ज्यामुळे शासन पातळीवर लेखापरीक्षण शुल्क विषयक माहित्या सादर करता आलेल्या नाहीत. धोरणात्मक उपाय योजनांसाठी असे संकलन आवश्यक असल्याने तालुका, जिल्हा व विभाग पातळीवर सहकारी संस्थांद्वारे नामतालिकेवरील लेखापरीक्षकांना अदा केलेल्या लेखापरीक्षण परिश्रमिक शुल्क संकलनामध्ये एकसुत्रता राखणेस्तव पुढील प्रमाणे निर्देश देणेत येत आहेत.

विभागीय ... सहकारी संस्था

१) राज्यातील तालुका निहाय प्रत्येक जिल्हयाने सदरहू परिश्रमिक लेखापरीक्षण शुल्क संकलन, सोबत विहीत केलेल्या प्रपत्रामध्ये जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी संयुक्तरित्या प्रतिवर्षी दिनांक ३० नोव्हेंबर अखेरपर्यंत एक्सेल शीटमध्ये करावे.

२) विभाग स्तरावर संलग्न जिल्हयाचे संकलन होऊन लेखापरीक्षण परिश्रमिक शुल्काची माहिती सर्व संबंधीत विभागीय सहनिबंधक प्रशासन व लेखापरीक्षण यांनी संयुक्तरित्या प्रतिवर्षी दिनांक १५ डिसेंबर पर्यंत सहकार आयुक्त कार्यालयास एक्सेल शीटमध्ये सॉफट कॉपी द्वारे सादर करावी.

३) राज्यस्तरीय व विभाग स्तरीय कार्यक्षेत्र असणा-या सहकारी संस्थांचे मुख्यालय ज्या तालुका / जिल्हयामध्ये आहे, तेथील संकलनामध्ये अशा संस्थांचे लेखापरीक्षण शुल्काचा समावेश करावा.

४) सन २०१५-१६ अखेरील लेखापरीक्षण परिश्रमिक शुल्काची माहिती दिनांक ३१ मार्च २०१७ अखेर विभागीय कार्यालयांनी सहकार आयुक्त कार्यालयास सादर करावी.

महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या अधिनियमातील कलम ८१ (१) (फ) व नियम ७४ अन्वये सहकारी संस्थेचा लेखापरीक्षक किंवा लेखापरीक्षा करणारी लेखापरीक्षक फर्म यांचे लेखापरीक्षण परिश्रमिक शुल्काचे संकलन अनुक्रमांक १ ते ४ अन्वये पारीत निर्देशाप्रमाणे यापुढे प्रतिवर्षी काटेकोरपणे विहीत मुदतीत केले जाईल असे पहावे.

**सोबत - प्रपत्र अ १, अ २, अ ३ व ब**

(चंद्रकांत दळवी)
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे.**

<u>प्रत पुढील उचित कार्यवाहीस्तव -</u>

१. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन व लेखापरीक्षण) सर्व
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
३. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)

<u>प्रत माहितीस्तव -</u>

१. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. साखर आयुक्त, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५
३. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. दुग्ध विकास आयुक्त, वरळी दुध डेअरी, वरळी मुंबई.
५. मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त, तारापोरवाला मत्स्यालय, मरीन लाईन मुंबई.
६. विशेष कार्य अधिकारी, लेखापरीक्षा मंडळ, पदुम महाराष्ट्र राज्य मुंबई.
७. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. अपर निबंधक (वसुली व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. अपर निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. अपर निबंधक (तपासणी व निवडणुका), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. अपर निबंधक (लेखापरीक्षण), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. सर्व कार्यासन अधिकारी, सहकार आयुक्त कार्यालय पुणे.

## प्रपत्र - अ १

(लेखापरिक्षण विभागाचे परिपत्रक जा.क्र. सआ/लेखापरिक्षण/परिपत्रक/लेप.शुल्क.संकलअ/३९७/२०१७ दिनांक १७/०२/२०१७ सोबतचे)

**सनदी लेखापाल फर्म / सनदी लेखापाल / प्रमाणित लेखापरिक्षक यांचे लेखापरिक्षण परिश्रमिक शुल्क आकारणी, वसुली व शिल्लक या बाबतची माहिती**

**लेखापरिक्षण कालावधी - सन २०१५-२०१६ (३१ मार्च २०१६ अखेरचे)**

| अ. क्र. | लेखापरिक्षकाचे नाव | लेखापरिक्षक नेमणूक | जिल्हा | सहकारी संस्थेचे नाव व पत्ता | लेखापरिक्षणाचा कालावधी | आकारणी केलेले लेखापरिक्षण शुल्क | वसूल केलेले लेखापरिक्षण शुल्क | शिल्लक लेखापरिक्षण शुल्क |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ठरावाव्दारे/ परंतुकान्वये | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

ANNEXURE - 1

(लेखापरिक्षण विभागाचे परिपत्रक जा.क्र. सआ/लेखापरिक्षण/परिपत्रक/लेप.शुल्क.संकलअ/३९७/२०१७ दिनांक १७/०२/२०१७ सोबतचे)

**From CA Firm/CA Individual/Certify Auditor Audit fees Demand, Recovery & Pending Audit fees information**

**Audit Period 2015-2016 (Year ending 31st March 2016)**

| Sr. No. | Firm's /Auditor,s Name | Auditor Appointment<br>By Resolution / By Proviso | District | Co-op. Societies Name and Address | Audit Period | Audit Fess Demand | Audit Fees Recovered | Pending Audit Fees |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |